# महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,

# नागरीकांची सनद, २०१७

## :- नोंदणीकृत कार्यालय -:


**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित**

**प्रशासकीय भवन, ४ था मजला, आर.सी.चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई – ४०० ०७१**

**फोन नं. ०२२- २५२७ ५३७४ / २५२९ ९६८५ फॅक्स नं. ०२२- २५२२ ९२१९**

**वेबसाईट- www.msobcfdc.org ई-मेल – mdmsobcfdc@gmail.com, md@msobcfdc.org**

## अ. सेवांचा तपशील

महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामार्फत इतर मागासवर्ग प्रवर्गातील पात्र व्यक्तींकरीता खालील कर्ज वाटपाच्या विविध योजना राबवून अल्प व्याज दराने स्वयंरोजगाराकरीता कर्ज पुरवठा करण्यात येतो. सदर योजनांबाबतचे माहिती पत्रक जिल्हा कार्यालय व मुख्यालयात उपलब्ध असून, समक्ष मागणी केल्यास अभ्यागतांना ते उपलब्ध करुन दिले जाते.

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनेचे स्वरुप | |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | |
| | **राज्य महामंडळाची योजना** | | |
| १. | **राज्य महामंडळाची २०% बीज भांडवल योजना** | १. | राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा अग्रणी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून राबविते. |
| | | २. | महामंडळाचा सहभाग २०% |
| | | ३. | लाभार्थीचा सहभाग ५% व बँकांचा सहभाग ७५% असतो. |
| | | ४. | या योजनेमध्ये महत्तम प्रकल्प मर्यादा रु.५.०० लक्ष आहे |
| | | ५. | व्याजाचा दर ६% असून परतफेडीचा कालावधी ५ वर्ष आहे. |
| | | | |
| २. | **रु.२५,०००/- पर्यंतची थेट कर्ज योजना** | १. | शासनाकडून प्राप्त भाग भांडवलातून महामंडळ ही योजना राबविते. |
| | | २. | रु.२५,०००/- पर्यंत थेट कर्ज उपलब्ध. |
| | | ३. | लाभार्थीचा सहभाग निरंक. |
| | | ४. | व्याज दर २% |
| | | ५. | परतफेडीचा कालावधी - ३ वर्षे, मासिक / त्रैमासिक हप्त्यांमध्ये. |
| | | | |

| राष्ट्रीय महामंडळाच्या योजना | | | |
|---|---|---|---|
| १. | **मुदती कर्ज योजना** | १. | प्रकल्प मर्यादा रु.३.०० लक्ष पर्यंत. |
| | | २. | राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग ८५%.<br>राज्य महामंडळाचा सहभाग १०%, लाभार्थीचा सहभाग ५%, |
| | | ३. | व्याज दर ६%. |
| | | ४. | परतफेडीचा कालावधी ५ वर्षे. |
| | | | |
| २. | **स्वर्णिमा** | १. | प्रकल्प मर्यादा रु.०.७५ लक्ष पर्यंत. |
| | | २. | राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग ९५%.<br>राज्य महामंडळाचा सहभाग ५%, लाभार्थीचा सहभाग निरंक, |
| | | ३. | व्याज दर ५%. |
| | | ४. | परतफेडीचा कालावधी ७ वर्षे. |
| | | | |
| ३. | **महिला समृध्दी योजना** | १. | ग्रामिण व शहरी भागातील महिलांना बचत गटांमार्फत कर्ज पुरवठा. |
| | | २. | प्रकल्प मर्यादा रु.५.०० लक्षपर्यंत बचत गटातील २० सभासदांना प्रत्येकी रु.२५,०००/-. |
| | | ३. | राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग ९५%.<br>राज्य महामंडळाचा सहभाग ५%, लाभार्थीचा सहभाग निरंक. |
| | | ४. | व्याज दर ४%. |
| | | ५. | परतफेडीचा कालावधी ३ वर्षे. |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | **सुक्ष्म पत पुरवठा योजना** | १. | स्वयंसेवी संस्थेमार्फत बचत गटातील महिलांना / पुरुषांना संस्थेमार्फत कर्ज पुरवठा. |
| | | २. | प्रकल्प मर्यादा रु.५.०० लक्षपर्यंत बचत गटातील २० सभासदांना प्रत्येकी रु.२५,०००/-. |
| | | ३. | राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग ९०%.<br>राज्य महामंडळाचा सहभाग ५%,<br>लाभार्थीचा सहभाग ५%. |
| | | ४. | व्याज दर ५%. |
| | | ५. | परतफेडीचा कालावधी ३ वर्षे. |
| | | | |
| ५. | **शैक्षणिक कर्ज योजना** | १. | आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी व संगणक या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता केंद्रीय परिषदांची मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांना पात्र संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांना कर्ज. |
| | | २. | प्रति वर्ष रु.२.५० लक्ष पर्यंत ४ वर्षाकरीता रु.१०.०० लक्ष. |
| | | ३. | राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग ९०%.<br>राज्य महामंडळाचा सहभाग ५%,<br>लाभार्थीचा सहभाग ५%. |
| | | ४. | व्याज दर ४%, विदयार्थ्यीनींना ३.५%. |
| | | ५. | परतफेडीचा कालावधी अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यांनंतर ५ वर्षामध्ये. |

## २. लाभार्थींची अर्हता -

- अर्जदार इतर मागासवर्गीय असावा.
- तो महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवाशी असावा.
- त्याचे वय १८ ते ५० वर्ष असावे.
- तो कोणत्याही बँकेचा, महामंडळाचा किंवा वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.
- राष्ट्रीय महामंडळाच्या योजनांसाठी ग्रामीण भागातील अर्जदाराचे व अर्जदाराच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने वार्षिक उत्पन्न रु.९८,०००/- या मर्यादेत असावे.
  तर शहरी भागातील अर्जदाराचे उत्पन्न रु. १,२०,०००/- या मर्यादेत असावे.
- राज्य महामंडळाच्या योजनांसाठी ग्रामीण व शहरी भागातील लाभार्थींकरिता कुटूंबाचे सर्व मार्गाने महत्तम वार्षिक उत्पन्न रु.१.०० लक्ष असावे.
- कुटूंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.
- अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल, त्या व्यवसायाचे त्याला ज्ञान किंवा अनुभव असावा.
- कर्जाच्या अटी व शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे राहतील.

## ३. ***कर्ज मागणी प्रस्तावासोबत जोडावयाच्या आवश्यक कागदपत्रांची यादी :-***

- सक्षम अधिका-याने दिलेला संपूर्ण कुटूंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला.
- जातीचे प्रमाणपत्र, शिधापत्रिकेची प्रमाणित प्रत, पासपोर्ट साईज फोटो, फोटो ओळखपत्र (उदा. निवडणूक ओळखपत्र, आधार कार्ड)
- व्यवसाय स्थळाची भाडे पावती, करारनामा, ७/१२ उतारा
- अर्जदाराच्या शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र / जन्म तारखेचा दाखला
- २ सक्षम व्यक्तींची कर्ज मागणी अर्जावर साक्षीदार म्हणून स्वाक्षरी
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे व्यवसाय करण्याबाबत ***ना-हरकत प्रमाणपत्र***

- अर्जदाराला ज्या प्रयोजनासाठी कर्ज मंजूर होणार आहे, त्या प्रयोजनासाठी त्याचा उपयोग करण्याबाबतचे अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र.
- तांत्रिक व्यवसायासाठी जे परवाना / लायसन्स आवश्यक असतील असे परवाने / लायसन्स.
- व्यवसायाचा प्रकल्प अहवाल, या अहवालासोबत लागणारा कच्चा माल, यंत्र सामुग्री इत्यादी बाबतचे दरपत्रक.

**सूचना : अर्जदाराने मुळ प्रमाणपत्र न जोडता त्याच्या स्व-साक्षांकित प्रती जोडाव्यात.**

## ब. सेवा पुरविणारे अधिकारी - जिल्हा व्यवस्थापक

| अ.क्र. | जिल्हा | अधिकाऱ्यांचे नाव |
|---|---|---|
| १. | मुंबई शहर | श्री. डी.ए. काकडे |
| २. | मुंबई उपनगर | श्री. डी.ए. काकडे |
| ३. | ठाणे | श्रीमती व्ही.व्ही.केसरकर |
| ४. | पालघर | श्री. के. एस. म्हस्के |
| ५. | रायगड | श्री. एन.व्ही. नार्वेकर |
| ६. | रत्नागिरी | श्रीमती प्रिती आर. पटेल |
| ७. | सिंधूदुर्ग | श्री. एन.पी. साळसकर |
| ८. | पुणे | श्री. ए. टी. मालुसरे |
| ९. | सातारा | श्री. व्ही.ए. सातपुते |
| १०. | सांगली | श्री.एन.एस.राणे |
| ११. | सोलापूर | श्री. बी.जे. मुगदल |
| १२. | कोल्हापूर | श्री.एच. पी. बिरादार |
| १३. | नाशिक | श्री. जी. व्ही. डोईफोडे (अ.का.) |
| १४. | धुळे | श्री. एस.एम. जोशी |
| १५. | नंदुरबार | श्री. आर.डब्ल्यु .कवडे |
| १६. | जळगाव | श्री. एस.जी.तायडे |
| १७. | अहमदनगर | श्री. डि. वाय. चव्हाण |
| १८. | औरंगाबाद | श्री. ए.व्ही. ठवकर |
| १९. | जालना | श्री. ए.एस. मुगदल |
| २०. | परभणी | श्री. जे.झेड राठोड |
| २१. | हिंगोली | श्री. ए.एस. समुद्रे |

| | | |
|---|---|---|
| २२. | बीड | श्री. एस. आर. गुठे |
| २३. | नांदेड | श्री. एस.एन.झुंजारे |
| २४. | उस्मानाबाद | श्री. व्ही. एन. मोहोरकर |
| २५. | लातूर | श्री. पी. सी. पोहरे |
| २६. | बुलढाणा | श्री. जे. डी. देशमुख |
| २७. | अकोला | श्री. एम.व्ही. उमक |
| २८. | वाशिम | श्री.जी.एच. शेंडे |
| २९. | अमरावती | श्री. एन.एल. पाटील |
| ३०. | यवतमाळ | श्री.एस.एस. तारे |
| ३१. | नागपूर | श्री. एस.पी. ब्रम्हे |
| ३२. | वर्धा | श्री. डी.पी. कुकडे |
| ३३. | भंडारा | श्री. सी.बी. भंगाळे |
| ३४. | गोंदीया | श्री. सी. एम. श्रीखंडे |
| ३५. | चंद्रपुर | श्री. व्ही.एम. अंधारे |
| ३६. | गडचिरोली | श्री. एस. पी. बावनकर |

महामंडळाची बहुतेक सर्व जिल्हा कार्यालये संबंधीत जिल्हयाच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन मध्ये आहेत.

**क. सेवा पुरविण्याची कार्यपध्दती व कालावधी :**

१. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींना / लाभार्थींना विहित नमुन्यातील कर्ज मागणी अर्ज महामंडळाच्या जिल्हा कार्यालयातून आवश्यक शुल्क आकारुन उपलब्ध केले जातात.

२. विहित नमुन्यातील कर्ज मागणी अर्जासह आवश्यक कागदपत्रे जोडून अर्जदार कर्ज मागणी प्रस्ताव जिल्हा कार्यालयामध्ये दाखल करतात. सदर कर्जप्रस्तावांची व त्यासोबतच्या

कागदपत्रांची तपासणी जिल्हा व्यवस्थापक यांचेमार्फत केली जाते. प्राप्त कर्ज प्रस्तावांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.महाम-१०/२००१/प्र.क्र.२३६/विघयो-२, दि. ३० नोव्हेंबर, २००४ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हा लाभार्थी निवड समितीची मान्यता घेण्यात येते. जिल्हा लाभार्थी निवड समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्यांचा समावेश असतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी | :: | अध्यक्ष |
| २. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | :: | सदस्य |
| ३. | त्या गटातील अग्रणी बँक व्यवस्थापक | :: | सदस्य |
| ४. | प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संबंधीत तालुका / जिल्हा) | :: | सदस्य |
| ५. | जिल्हा संघटक, महाराष्ट्र उदयोजकता विकास केंद्र / मिटकॉन | :: | निमंत्रक |
| ६. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी (गट-अ), जिल्हा परिषद | :: | |
| ७. | संबंधीत महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक | :: | सदस्य सचिव |

३. समितीची बैठक दर महिन्यातून एकदा आयोजित करण्याविषयी शासनाचे आदेश आहेत.

४. जिल्हा लाभार्थी निवड समितीकडून निवड झालेल्या २०% बीज भांडवल योजनेतील लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्ताव संबंधीत बँकांकडे पुढील मंजूरीसाठी जिल्हा व्यवस्थापक यांचेकडून पाठविले जातात.

५. उर्वरीत सर्व योजनांचे कर्ज प्रस्ताव मंजूरीच्या पुढील कार्यवाहीसाठी मुख्यालयाकडे पाठविले जातात. राष्ट्रीय महामंडळाच्या योजनांतर्गत प्राप्त कर्ज प्रस्तावांना निधीच्या उपलब्धेनुसार मुख्यालय लाभार्थी निवड समितीकडून मंजूरी देण्यात येते.

६. कर्ज मंजूरीनंतर महामंडळाच्या नियमानुसार लाभार्थींनी विहित कालावधीत वैधानिक कागदपत्रांची व जामिनदारांची पूर्तता केल्यानंतर राष्ट्रीय महामंडळाच्या योजनांतर्गत निधी उपलब्धतेनुसार लाभार्थींना कर्ज वितरण करण्यासाठी जिल्हा कार्यालयाकडे कर्ज रक्कमेचा निधी वर्ग केला जातो.

**ड. सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा**

जिल्हा कार्यालयांकडे प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावांची तपासणी एक महिन्याच्या आत न झाल्यास व जिल्हा लाभार्थी निवड समितीने मंजूर केलेले कर्ज प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी बँक / महामंडळाच्या मुख्यालयाकडे एक महिन्याच्या आंत न पाठविल्यास त्याबाबत व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे तक्रार दाखल करता येते. त्यांचा पत्ता खालीलप्रमाणे आहे :-

**व्यवस्थापकीय संचालक**

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,**

**प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.**

**दूरध्वनी : ०२२ - २५२९ ९६ ८५ फॅक्स - ०२२ - २५२२ ९२१९**

**वेबसाईट : www.msobcfdc.org ई-मेल – mdmsobcfdc@gmail.com**

************